# विद्यार्थी विकास मंडळ २०१९-२० अहवाल

डॉ. भगवान माळी
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी
२५/०३/२०२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे मार्गदर्शन तत्वानुसार आपल्या महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ यांचे माध्यमातून विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या शैक्षणिक, समाजिक, राजकीय, सांस्कृतिक असा सर्वांगिण विकास होण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले.

1. **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना** - या योजनेअंतर्गत सहभागी होवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी सविस्तर सूचना लावण्यात आली. इच्छूक विद्यार्थ्यांकडून त्यांचे वैयक्तिक व शैक्षणिक संदर्भातील फॉर्म भरून घेण्यात आला त्यानंतर तज्ञ प्राध्यापकांच्या निवड समितीने इच्छूक विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेवून हुशार, गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांची या योजनेसाठी निवड केली. निवड केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील प्रशासन विभाग, विविध शैक्षणिक विभाग, प्रयोगशाळा, जिमखाना, गार्डन, ग्रंथालय, प्रिंटिग प्रेस येथे दररोज दोन तास काम दिले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे कामाचे मानधन त्यांच्या स्वतःच्या बँक खात्यावर जमा केले. या वर्षामध्ये या योजने अंतर्गत एकूण २२६ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. तसेच रू. १३३३६२०/- मानधन स्वरूपात सहभागी विद्यार्थ्यांचे बँक खात्यावरती जमा केले.

2. **विशेष मार्गदर्शन योजना** – या योजने अंतर्गत खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

| Sr.No. | Activity Name | Dates | Participants |
|---|---|---|---|
| 01 | Nirbhay Kanya Workshop | 28/01/2020 | 660 |
| 02 | Film Making | 12/03/2020 | 60 |
| 03 | Harbal Cosmetics | 04/02/2020 | 250 |
| 04 | Anchoring workshop | 12/02/2020 | 105 |
| 05 | Flock Art | 23/01/2020 | 107 |
| 06 | Mashroom Cultivation | 08/02/2020 | 258 |
| 07 | Entrepreneurship Development in Food Processing | 10/02/2020 | 125 |
| 08 | Statistics Seminar Competition T.Y.B.Sc. | 11/03/2020 | 116 |
| 09 | R.J.Gandhi Lecture Competition for Chemistry Students | 02/03/2020 | 19 |
| 10 | Patent | 27/02/2020 | 305 |

3. **संविधान दिन :** २६ नोव्हेंबर २०१९ रोजी भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय सविंधानाचे उदेदशपत्रिकेतील शपथ विद्यार्थ्यांना उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी दिली.

4. **निवाडा लोकशाही पंधरवडा :** या उपक्रमाअंतर्गत २५ जानेवारी २०२० रोजी मतदार दिनानिमित्त राज्यशास्त्र विभागाच्यावतीने मतदानातील महत्व या विषयावर श्री. दादासाहेब कांबळे व उपजिल्हाधिकारी व श्री. विजय पाटील, प्रांताधिकारी बारामती यांचे व्याख्यानपर मार्गदर्शन झाले. त्याचबरोबर विविध उपक्रमांतर्गत आयोजित कार्यशाळेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी मतदार नाव नोंदणी बाबत मार्गदर्शन केले.

5. **आय.क्यु.ए.सी. युवा महोत्सव २०१९ :** दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये गुरूवार दि. २६ डिसेंबर २०१९ ते शनिवार दि. २७ डिसेंबर २०१९ या कालावधीमध्ये आय.क्यु.ए.सी. युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना विकसित करण्यासाठी तसेच विविध कलागुणांना विकसित करण्यासाठी विविध प्रकारच्या पोस्टर प्रदर्शन, फोटोग्राफी स्पर्धा, फुड स्टॉल, पुष्परचना, रांगोळी, गायन, चालताबोलता प्रश्नमंजुषा, क्वीज स्पर्धा, निबंध स्पर्धा इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर भारतीय सांस्क्रतिक परंपरा जोपासण्यासाठी साडी डे, मिसमॅच डे, पारंपारिक वेशभूषा असे डे सुध्दा साजरे करण्यात आले. या महोत्सवामध्ये २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

6. **दिव्यांग दिनाचे आयोजन :** दिव्यांग दिनानिमित्त चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. दिव्यांगाना सामाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेत त्याना सन्मानाची वागणूक मिळावी असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी व्यक्त केले. तसेच मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय शिंदे यांनी दैनंदिन जीवनात निरोशवर मात करून जीवनाचा प्रत्येक क्षेत्रात यशस्वी कसे होता येते याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

वरील प्रमाणे अहवाल देत आहे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

डॉ. भगवान माळी
विद्यार्थी विकास अधिकारी




Anchoring Workshop

"Herbal Cosmetics Guest Lecture" Workshop participants.




Herbal Cosmetics workshop




Mushroom Cultivation




Nirbhay Kanya
Workshop

Short Film Making
Workshop






Late Prof. R.J.Gandhi
Lecture Competition